


दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com RNI NO-MAHMAR/2022/90217
वर्ष ३ रे अंक : ३५१ वा शुक्रवार दि २४ एप्रिल २०२६ पृष्ठ ८ किमंत ३ रुपये

# शिवाजी कोण होता? पुस्तकावरून आमदाराचा संताप; प्रकाशकाला जीवे मारण्याच्या धमक्या, शिव्या अन् समाजावर आक्षेपार्ह शब्दांचा आरोप!

## व्हायरल ऑडिओने खळबळ....

**जनसंचलन/ बुलढाणा**

कोल्हापूरमधून एक अत्यंत धक्कादायक आणि राजकीय वादाला पेटवणारी घटना समोर आली असून शिवसेना आमदार संजय गायकवाड पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आले आहेत. शिवाजी कोण होता? या ऐतिहासिक पुस्तकावरून सुरू झालेला वाद आता थेट धमकी, शिवीगाळ आणि सामाजिक वातावरण तापवणाऱ्या आरोपांपर्यंत पोहोचला आहे. कोल्हापूरमधील प्रशांत आंबी यांना आमदार गायकवाड यांनी फोन करून तब्बल नऊ मिनिटे संवाद साधल्याचा दावा करण्यात आला आहे. या संभाषणादरम्यान पुस्तकाच्या लेखकाबाबत गैरसमज झाल्याने सुरुवात झाली आणि त्यानंतर परिस्थिती चिघळल्याचा आरोप आहे. आंबी यांच्या म्हणण्यानुसार, त्यांनी पुस्तक हे कॉम्रेड गोविंदराव पानसरे यांचे असल्याचे स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला. तसेच पुस्तकाचा उद्देश शिवाजी महाराजांचा अपमान करण्याचा नसून ऐतिहासिक संदर्भ मांडणे असल्याचेही त्यांनी सांगितले. मात्र, या स्पष्टीकरणानंतरही आमदार गायकवाड संतप्त झाले




आणि त्यांनी अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करत तुझी जीभ कापून टाकतो, घरात घुसून मारतोफ्फ आणि आंबी यांच्या घरातील आई,बहीण, पत्नी, यांना अश्लील शब्दात शिवीगाळ अशा प्रकारच्या गंभीर धमक्या दिल्याचा आरोप आंबी यांनी केला आहे. यासोबतच तू पण पानसरे यांच्याकडे जाशीलफ्फ अशा शब्दांत धमकी दिल्याचेही सांगितले जात आहे.

ही ऑडिओ क्लिप सध्या सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाली असून राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. मात्र दोन्ही बाजूंनी या प्रकरणावर प्रतिक्रिया नोंदवल्या गेल्याचे समोर आले आहे. आंबी यांनी स्पष्ट केले की, अशा धमक्यांना आम्ही भीक घालत नाही. आम्ही पानसरे यांच्या विचारधारेतून घडलेले कार्यकर्ते आहोत. सत्य इतिहास लोकांपर्यंत पोहोचवत राहू. त्यांनी राजारामपुरी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्याची तयारी दर्शवली आहे. दरम्यान, या प्रकरणामुळे सामाजिक स्तरावरही तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत. काही नागरिक आणि सामाजिक कार्यकर्ते आमदारांच्या वक्तव्यावर आक्षेप घेत असून ज्या समाजाच्या मतदानाच्या बळावर सत्तेत पोहोचता, त्याच समाजाबाबत असे शब्द वापरणे कितपत योग्य? असा प्रश्न नागरिकांमध्ये उपस्थित होत आहे. या संपूर्ण प्रकरणामुळे राजकीय वातावरण अधिक तापले असून पुढील कारवाईकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# न्यायालयाचा आदेश आणि सरकारनं फिरवली चक्र, आदर्श महाविद्यालयांतील शिक्षकांचा वनवास संपला; आगामी पदभरतीतही फायदा

**वृत्तसंस्था/ पुणे**

महाराष्ट्र सरकारने उच्च शिक्षण क्षेत्रात शिकवणी करणाऱ्या शिक्षकांसाठी आता मोठा निर्णय घेतला आहे. राज्य सरकारने आता आदर्श महाविद्यालयांमधील शिक्षकांच्या मागण्या मान्य केल्या असून त्यांना आता मोठ्या सुविधा लागू करण्यात येणार आहेत. नुकतीच मंत्रिमंडळ बैठक पार पडली. या बैठकीमध्ये राज्यातल्या सात आदर्श महाविद्यालयांतल्या शिक्षकांना यूजीसी स्केलनुसार मूळ वेतन त्याशिवाया महागाई भत्ता आणि इतर भत्ते लागू करण्यासाठी हिरवा कंदील दाखवला आहे. यामुळे या निर्णयातून अनेक वर्षे प्रलंबित असलेला वेतनाचा प्रश्न अखेल सुटला आहे. दरम्यान, राज्य सरकारने घेतलेल्या या निर्णयामुळे सात महाविद्यालयांमधील प्राध्यापक आणि शिक्षकांना पदावर काम करताना आता यूजीसी स्केलने मूळ वेतन, महागाई भत्ता आणि अन्य भत्तेही मिळणार आहेत. याचा परिणाम म्हणजे आता शिक्षकांच्या आर्थिक अडचणी दूर होऊ शकतील. फक्त एवढंच नाही तर उच्च आणि तंत्रशिक्षण विभागाच्या भविष्यात होणाऱ्या पदभरतीमध्येही या सर्व शिक्षकांना अतिरिक्त १० गुण दिले जाणार आहेत.

राज्यात अनेक शिक्षक हे तासिका तत्वावर किंवा मर्यादित वेतन श्रेणीवर काम करतात. मात्र आता सहाय्यक प्राध्यापकांच्या यूजीसी स्केलने वेतनाचा मार्ग मोकळा झाला आहे. डीएच्या वाढीमुळे प्रत्यक्ष हातात येणाऱ्या वेतनात आता मोठी वाढ होणार आहे. त्यामुळे याविषयी अनेक शिक्षकांनी न्यायालयात धाव घेतली होती, त्यांना आता न्याय मिळाला आहे. उच्च आणि तंत्रशिक्षण विभागानं हा प्रस्ताव सादर केल्यानंतर त्याला न्यायालयाकडून मान्यता देण्यात आली आहे. दरम्यान, या मोठ्या निर्णयामुळे आता समान काम, समान वेतन या तत्वाला बळ मिळणार आहे. शिक्षक संघटनांनी या निर्णयाचं स्वागत केलं आहे. या निर्णयामुळे शिक्षकांचा आत्मविश्वास वाढणार आहे, त्यांची शिक्षणाची गुणवत्ता सुधारणार आहे, अशा प्रतिक्रिया यावेळी शिक्षकांनी दिल्या आहेत. एकूणच काय तर या निर्णयामुळे शिक्षकांना आर्थिक दिलासा मिळाला आहे. त्यांना करिअरमध्ये अतिरिक्त संधीसाठी वाव मिळाला आहे आणि शिक्षण व्यवस्थेला बूस्ट मिळाला आहे. जालना जिल्ह्यातील घनसांवगी (डॉ. बाबासाहेब आंबेडकर



मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांच्याशी संलग्र), बुलढाणा (संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती), रायगड जिल्ह्यात श्रीवर्धन (श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई), हिंगोली (स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड), गडचिरोली (गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली), रत्नागिरी जिल्ह्यात आंबवडे आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यात तळेरे येथे (मुंबई विद्यापीठ मुंबई, संलग्र) ही सात आदर्श महाविद्यालये आहेत.

# विकासदराला इंधनधक्का




अमेरिका-इस्रायल आणि इराण यांच्यातील युद्ध आणखी लांबले, तर विकासदरावर विपरीत परिणाम होण्याचा संयुक्त राष्ट्रसंघाच्या आर्थिक व सामाजिक आयोगाने (एस्कॅप) दिलेली इशारा ही साऱ्या जगासाठी धोक्याची घंटा आहे. विकसनशील देशांना युद्धाची धग अधिक तीव्रपणे जाणवेल, अशी भीती हा अहवाल व्यक्त करतो. गेल्या काही काळातील भारताच्या विकासगतीलासुद्धा युद्धाने खीळ बसण्याची शक्यता असून, सन २०२६ मध्ये विकासदर ६.४ टक्के, तर पुढील वर्षी तो ६.६ टक्के राहील, असा इएस्कॅपच्या अंदाज आहे. जगातील इतर देशांच्या तुलनेत भारताचा विकासदर चांगला राहील, असा अंदाज असला, तरी इराण युद्धातून लवकर तोडगा न निघाल्यास विकासदराच्या घसरणीसह महागाईचाही सामना करावा लागू शकतो. त्यामुळेच अमेरिका आणि इराण यांच्यातील युद्धसमाप्तीबाबतच्या चर्चेकडे साऱ्या जगाचे डोळे लागून राहणे साहजिक आहे. गेल्या काही वर्षांत भारताच्या विकासाची गाडी वेगाने धावू लागली होती. करोनासाथीनंतर अर्थव्यवस्थेने उभारी घेतल्याने सन २०२३-२४ मध्ये ८.२ टक्के विकासदर नोंदवला गेला; त्यानंतरही २४-२५ मध्ये ७.२ टक्क्यांची सातत्यपूर्ण वाढ झाली. गेल्या वर्षी तर वस्तू व सेवा करात (जीएसटी) देण्यात आलेली सवलत, सेवाक्षेत्राने घेतलेली भरारी, परदेशस्थ नागरिकांना देशात पाठवलेला पैसा (रेमिटन्स) आणि अमेरिकी आयातशुल्कातील वाढीपूर्वी झालेली भरभक्कम निर्यात यांमुळे हा दर ७.४ राहिला. केवळ भारतच नव्हे, तर साऱ्या आशियातील विकासदरामध्येही त्याचे प्रतिबिंब उमटले. मात्र, त्यानंतर विकासदराची गाडी मंदावली. व्यापारकरारामध्ये दबाव आणण्यासाठी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी रशियन तेलखरेदीचा मुद्दा पुढे करून भारतावर ५० टक्के आयातशुल्क लादल्याने आणि इरेमिटन्सफवर एक टक्का कर लागू केल्याने त्यावर परिणाम होण्याची शक्यता आहे. एकीकडे अमेरिकी न्यायालयाने ट्रम्प प्रशासनाला आयातशुल्क दहा टक्क्यांपर्यंत आणण्याचा आदेश दिल्याने भारताला दिलासा मिळाला होता; मात्र युद्धस्थितीने त्याचा आनंद साजरा करू दिला नाही. अमेरिका-इस्रायल आणि इराण यांच्या युद्धात जगाचीच कोंडी झाली आहे; त्यातही होर्मुझची सामुद्रधुनी बंद झाल्याने आखाती देशांचा संपर्क खंडित होऊन भारतासह अनेक देशांची इंधनकोंडी झाली आहे. युद्धकाळात कच्च्या तेलाच्या दरांनी शंभरी ओलांडल्याने इंधनावरील आयातखर्च वाढला आहे. गेली दोन वर्षे देशाच्या बहुतांश भागांत समाधानकारक मान्सून झाला होता. यंदा मात्र, इएल निनोफमुळे सरासरीच्या ९२ टक्के इतक्याच पावसाचा प्राथमिक अंदाज आहे. त्याबरोबरच आखाती देशांमधील उत्पादन आणि वाहतुकीचे चक्र बिघडल्याने युरिया आणि इडीएपीफसारख्या खतांच्या टंचाईची मोठी चिंता भेडसावत आहे. त्याचा फटका शेती उत्पादनाला बसून ग्रामीण अर्थव्यवस्था विस्कळित होऊ शकते. या अस्थिरतेमुळे परदेशी गुंतवणुकीवर मोठा परिणाम झाल्याचे दिसते. या सगळ्या पार्श्वभूमीवर युद्ध थांबले, तरी जागतिक विकासदरात ०.३ टक्के घट होऊ शकते; युद्ध लांबले तर मात्र हा फटका अडीच टक्क्यांवर जाऊ शकतो, असे अर्थतज्ज्ञांचे अंदाज आहेत. कच्च्या तेलाचे वाढलेले दर कमी झाले, तरी युद्धपूर्व स्थितीत जाणार नाहीत, यावर अभ्यासकांचे एकमत आहे. उत्पादन शुल्कात केंद्राने दहा रुपयांची सवलत दिल्याने देशात पेट्रोल-डिझेलचे दर सध्या तरी आटोक्यात आहेत; मात्र ही तूट फार काळ सोसणे सरकारला अडचणीचे ठरेल, त्यामुळे विधानसभा निवडणुका संपल्यावर यातील काही भार ग्राहकांना सोसावा लागेल; परिणामी इंधन दरवाढ आणि वाहतूक खर्चात वाढ होऊन महागाईचा दरही ४.४ टक्क्यांवर जाण्याची भीती आहे. सातत्याने होत असलेली रुपयाची घसरण ही बाह्य संकटे भारतासाठी अधिक तीव्र करते; नुकतेच भारतीय अर्थव्यवस्थेचे स्थान सहाव्या क्रमांकावर गेले, त्याचेही हेच मुख्य कारण आहे. त्यामुळे येत्या काळात सरकारी खर्चांवर नियंत्रण आणणे, इरेवडीफ योजनांवरील खर्चात कपात हे तातडीचे उपाय सांगितले जातात. दीर्घ काळासाठी आखातावरील इंधन अवलंबित्व कमी करून अन्य स्रोतांतून पुरवठा वाढवणे आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे हरित इंधनाच्या वापरास अधिकाधिक प्रोत्साहन देऊन एकूण इंधनखर्च आटोक्यात आणण्याकडे मात्र जाणीवपूर्वक लक्ष दिले पाहिजे.




The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# मणिपूरमध्ये तणाव; थौबालमध्ये गोळीबार, सीमावर्ती भागात आदिवासी संघर्ष

## 'यूएनसी'च्या बंदमुळे अनेक जिल्ह्यांतील जनजीवन ठप्प

■ मणिपूर/वृत्तसंस्था

मणिपूरच्या थौबाल जिल्ह्यात मंगळवारी मुख्यमंत्री वाय. खेमचंद सिंह यांच्या कार्यक्रमाच्या ठिकाणाकडे जमावाने कूच केल्यानंतर सुरक्षा दलांनी केलेल्या कथित गोळीबारात एक व्यक्ती जखमी झाली, अशी माहिती पोलिसांनी दिली. दरम्यान, मणिपूरमधीलच सेनापती आणि त्याला लागून असलेल्या कांगपोकपी जिल्ह्यांच्या सीमेवर मंगळवारी पुकारलेल्या बंदच्या मुद्द्यावरून दोन आदिवासी समुदायांमध्ये संघर्ष झाला.

यामुळे या परिसरात तणाव निर्माण झाल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. थौबाल जिल्ह्यातील वांगजिंग तेंथा येथे नव्याने बांधलेल्या 'बीडीओ' कार्यालयाच्या उद्घाटनासाठी मंगळवारी मुख्यमंत्री आले असताना कथित गोळीबारीची घटना घडली. पोलिसांच्या निवेदनानुसार, दगड आणि गोफण हातात घेऊन एक मोठा गट कार्यक्रमाच्या दिशेने येत होता.



पोलिसांनी वारंवार इशारा देऊनही जमाव आक्रमकपणे पुढे सरकत राहिला, ज्यामुळे सार्वजनिक मालमत्ता आणि उपस्थित मान्यवरांच्या सुरक्षेला धोका निर्माण झाला होता. सुरुवातीला किमान बळाचा वापर करण्यात आला, मात्र परिस्थिती बिघडल्यानंतर प्रस्थापित नियमांनुसार शेवटचा पर्याय म्हणून नियंत्रित गोळीबार करण्यात आला, असे पोलिसांनी सांगितले. या कारवाईत एलांगबाम नंदबीर सिंह (४०) हे जखमी झाले. ते 'ग्राम संरक्षण दला'चे जवान आहेत. यानंतर परिस्थिती नियंत्रणात आली, असे पोलिसांनी निवेदनात म्हटले आहे.

डोंगराळ भागात फिरताना मला कोणतीही अडचण आली नाही, पण थौबाल जिल्ह्यात भेटीला झालेला विरोध पाहून आश्चर्य वाटले. मतभेद चर्चेद्वारे सोडवले जाऊ शकतात.

एका अधिकाऱ्याने सांगितले की, चांगौबुंग कुकी गावातील रहिवासी आंदोलनात सहभागी झाल्यानंतर परिस्थिती तणावपूर्ण बनली आणि त्यामुळे दोन्ही बाजूंमध्ये दगडफेक झाली. या गोंधळादरम्यान काही फैरी झाडण्यात आल्या. तथापि, हे कोणी केले हे अद्याप स्पष्ट झालेले नाही, असे अधिकाऱ्याने नमूद केले. 'युनायटेड नागा कौन्सिल'ने (यूएनसी) पुकारलेल्या तीन दिवसीय बंदमुळे राज्यातील उखरुल, कामजोंग, सेनापती, नोने आणि तामेंगलोंग यांसह नागा-बहुल असलेल्या सर्व भागांतील जनजीवन ठप्प झाले. हा बंद २० एप्रिलच्या मध्यरात्रीपासून सुरू झाला.

### दोन घटना आणि संघर्षाची ठिणगी..

७ एप्रिल २०२६ रोजी मणिपूरच्या बिष्णुपूर जिल्ह्यातील त्रोंगलाओबी भागात रॉकेट किंवा बॉम्बचा संशयित हल्ला झाला; यात एक पाच वर्षांचा मुलगा आणि एक सहा महिन्यांच्या मुलीचा मृत्यू झाला. पहाटे कुटुंब झोपलेले असताना, हा हल्ला झाला. यात मुलांची आई जखमी झाली. बिष्णुपूरमध्ये झालेल्या दोन मुलांच्या हत्येप्रकरणी 'संयुक्त कृती समिती'च्या सर्व मागण्या पूर्ण केल्या जातील, पीडितांच्या पालकांना सरकारी नोकरी देण्याचा विचार सरकार करत असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.- १८ एप्रिल २०२६ रोजी मणिपूरच्या उखरुल जिल्ह्यातील टीएम कासोमजवळ, राष्ट्रीय महामार्ग-२०२ वर अतिरेक्यांनी केलेल्या हल्ल्यात दोन तांगखुल नागा पुरुषांचा मृत्यू झाला; यामध्ये लष्करातील एका निवृत्त जवानाचाही समावेश होता. उखरूलमधील दोन व्यक्तींच्या हत्येचा निषेध करण्यासाठी 'युनायटेड नागा कौन्सिल'ने (यूएनसी) तीन दिवसांचा बंद पुकारला होता. या वेळी नागा स्वयंसेवकांनी लावलेला रस्ता अडथळा पोलीस हटवत असताना संघर्षाची ठिणगी पडली.

# आधी मोदींना दहशतवादी म्हणाले नंतर दिलं स्पष्टीकरण, खरगेंचं विधान चर्चेत

■ नवी दिल्ली, वृत्तसंस्था :

काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी मंगळवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबाबत आक्षेपार्ह आणि वादग्रस्त विधान केले. मोदी दहशतवादी असल्याचं संबोधल्याने राजकीय क्षेत्रातून प्रतिक्रिया येऊ लागल्या. सर्वस्तरांतून त्यांच्यावर टीका होऊ लागल्यानंतर त्यांच्या वक्तव्यावर खरगेंनी स्पष्टीकरणही दिलं आहे. अण्णा द्रमुक आणि भाजपाच्या युतीवर टीका करताना त्यांनी वादग्रस्त विधान केले होते.

चेन्नईत पत्रकारांशी बोलताना खरगे यांनी अण्णा द्रमुकच्या निर्णयावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. ते म्हणाले, "जे लोक अण्णादुराईंचा फोटो लावतात, ते मोदींसोबत कसे जाऊ शकतात? ते (मोदी) एक दहशतवादी आहेत. त्यांचा पक्ष समता आणि न्यायावर विश्वास ठेवत नाही. अशा लोकांसोबत जाणे म्हणजे लोकशाही कमकुवत करणे आहे." ते पुढे म्हणाले, "तामिळनाडूला अशा नेत्यांची गरज आहे जे भाजपासमोर झुकणार नाहीत आणि खंबीरपणे उभे राहतील, जसे एम.के. स्टॅलिन आहेत. आज अण्णा द्रमुकने आपली ओळख गमावली असून तो भाजपचा 'मूक



गुलाम' भागीदार बनला आहे." वादानंतर खरगे यांनी आपल्या विधानावर स्पष्टीकरण दिले. ते म्हणाले की, त्यांना पंतप्रधानांना थेट 'दहशतवादी' म्हणायचे नव्हते, तर ते लोकांना आणि राजकीय पक्षांना "धमकावतात" (Terrorise) असे त्यांना सुचवायचे होते. "मी त्यांना दहशतवादी म्हटलेले नाही. मला हे स्पष्ट करायचे आहे की मोदी नेहमी धमकावण्याचे राजकारण करतात. ईडी, आयटी आणि सीबीआय सारख्या संस्था त्यांच्या हातात आहेत", असं खरगे म्हणाले. खरगे यांनी पंतप्रधान मोदींवर आचारसंहितेचे उल्लंघन केल्याचा आरोपही केला. संसद भवनमध्ये 'संविधान (१३१ वी दुरुस्ती) विधेयक, २०२६' मंजूर होऊ शकले नाही, तरीही पंतप्रधानांनी देशाला संबोधित केले, जे चुकीचे असल्याचे त्यांनी म्हटले.

# उपमुख्यमंत्री अजित पवार अपघाताबाबत शंका

## प्रचाराच्या सांगतेवेळी सुनेत्रा पवार यांचे विधान

■ बारामती/वृत्तसंस्था

बारामती विधानसभा मतदारसंघांतील पोटनिवडणुकीच्या प्रचाराच्या सांगता सभेवेळी सुनेत्रा पवार यांनी अजित पवार यांच्या विमानाला झालेल्या अपघाताबाबत पहिल्यांदाच जाहीरपणे मोठे विधान केले आहे. तसेच या अपघाताबाबत इतरांप्रमाणेच माझ्याही मनात शंका असल्याचे सुनेत्रा पवार यांनी म्हटले आहे.

बारामतीच्या ऐतिहासिक शारदा प्रांगणात विधानसभा पोटनिवडणुकीच्या प्रचाराची सांगता सभा मंगळवारी पार पडली. यावेळी त्या बोलत होत्या. राज्याचे तत्कालीन उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाचे प्रमुख अजित पवार यांचा २८ जानेवारी रोजी बारामती विमानतळाजवळ झालेल्या भीषण विमान अपघातात मृत्यू झाला होता. या अपघाताबाबत तेव्हापासूनच अनेक शंका उपस्थित केल्या जात होत्या. अजित पवार यांचे पुतणे रोहित पवार यांनी तर या अपघातावर वारंवार प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. मात्र अजित पवार यांच्या पत्नी आणि राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी याबाबत अद्याप जाहीररीत्या कुठलेही विधान केले नव्हते. दरम्यान, बारामती येथे प्रचारसभेला संबोधित करताना सुनेत्रा पवार म्हणाल्या की, अजितदादांच्या विमानाला झालेल्या दुर्दैवी अपघाताबाबत अनेकांच्या मनात शंका आहेत. ज्या शंका तुमच्या मनात आहेत, तशाच त्या माझ्याही मनात आहेत. या शंकांचे नक्कीच निरसन झाले पाहिजे. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर आपल्याला मिळाले पाहिजे.





### पण मी खचणार नाही; सुनेत्रा पवार भावुक..

सुनेत्रा पवार म्हणाल्या, मी माझे सर्वस्व हरपले, पण मी थांबणार नाही, खचणार नाही, मागे हटणार नाही. तसेच येसुबाई जशा लढल्या, अहिल्याबाई होळकरांनी जसा कारभार चालवला आणि आपल्या लोकांना न्याय दिला, त्याच निष्ठेने मी तुमची सेवा करेल, असे आश्वासन बारामतीच्या जनतेला सुनेत्रा पवार यांनी दिले.

### अपघाताचे सत्य शोधल्याशिवाय शांत बसणार नाही: फडणवीस

सुनेत्रा पवार यांचा विजय संपूर्ण भारतात गाजला पाहिजे, असे म्हणत बारामतीकरांना विक्रमी मतदान करण्याचे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. पोटनिवडणुकीसाठीच्या सांगता सभेला फडणवीस यांनी हजेरी लावत दादांच्या आठवणींना उजाळा दिला. आमच्यासाठी ही निवडणूक नव्हे तर दादांच्या स्मृतींचा यज्ञ सुरु आहे. सभेसाठी माझ्यासह कोणीही आले नसते तरी सुनेत्रा पवार विक्रमी मतांनी निवडून आल्या असत्या, असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. अजितदादांच्या अपघाताचे सत्य शोधल्याशिवाय शांत बसणार नाही, असे फडणवीस म्हणाले.

# 'पुरुष नेत्याच्या खोलीत गेल्याशिवाय महिला राजकारणात येऊच शकत नाहीत'



■ नवी दिल्ली, वृत्तसंस्था :

अपक्ष खासदार पप्पू यादव यांनी महिलांबाबत वादग्रस्त वक्तव्य केले आहे. 'पुरुष राजकीय व्यक्तीच्या खोलीत वेळ घालवल्याशिवाय अनेक महिला राजकारणात येऊच शकत नाहीत', असे वादग्रस्त वक्तव्य खासदार यादव यांनी केले आहे. पुरुष राजकारणी गिधाडं असल्याचेही यादव म्हणाले. महिला आरक्षण घटनादुरुस्ती विधेयकावर भाष्य करत असताना खासदार यादव यांची जीभ घसरली.

गेल्या आठवड्यात महिला आरक्षण घटनादुरुस्ती विधेयक नामंजूर झाले. आवश्यक बहुमत सरकारला न मिळल्याने घटनादुरुस्ती विधेयक मंजूर होऊ शकले नाही. विरोधकांनी डिलिमीटेशनचा मुद्दा उपस्थित करत हे विधेयकाला विरोध केला. यादव यांनी विधेयकावर मत मांडताना पुरुष राजकारण्यांना गिधडाची उपमा दिली. घरगुती हिंसाचार कोण करतंय? महिलांवर वाईट नजर कोण ठेवतंय? अमेरिका ते भारत, यात सर्व राजकीय नेते आहेत. पुरुष राजकीय नेत्याच्या रुममध्ये वेळ घालवल्याशिवाय ९० टक्के महिला राजकीय क्षेत्रात येऊच शकत नाहीत, असे खासदार पप्पू यादव म्हणाले.

"हे दररोज घडतंय. राजकीय नेत्यांचे आक्षेपार्ह व्हिडीओ रोज समोर येत आहेत. महिलांचा छळ करणे त्यांना त्रास देणे आजकाळ संस्कृती होऊ लागली आहे", असे पप्पू यादव म्हणाले. बिहारमधील पूर्णियाचे खासदार असणारे पप्पू यादव यांच्यावर या विधानानंतर जोरदार टीका केली जात आहे. "यादव यांचे वक्तव्य विरोधकांची मानसिकता दर्शवते", असे भाजपाचे प्रवक्ते शहजाद पूनावाला म्हणाले.

"अनेकवेळा संसदेत गेलेल्या नेत्याने असं वक्तव्य केलं आहे. त्यांचे निलंबित करुन त्यांना भविष्यात निवडणूक लढण्यास मनाई करायला हवी. राहुल गांधी आणि आरजेडी प्रमुख तेजस्वी यादव यांचे याबाबत काय मत आहे?", असे सवाल चारु यांनी उपस्थित केला. दरम्यान, पप्पू यादव यांच्या वक्तव्यामुळे राजकीय वर्तुळातून तीव्र संताप व्यक्त करण्यात येत असून, यादव यांच्यावर टीका केली जात आहे. वक्तव्याची दखल घेऊन बिहारच्या महिला आयोगाने त्यांना नोटीस बजावली आहे.

# जर्मनीत गुरुद्वारामध्ये मोठा राडा, 40 जणांच्या जमावात हाणामारी; निधीवर कुणाचं नियंत्रण? हा वाद विकोपाला!

**मोअर्स, वृत्तसंस्था :**

जर्मनीतील मोअर्स (ड्युसबर्ग परिसर) येथील एका गुरुद्वारामध्ये सोमवारी दोन गटांमध्ये झालेल्या भीषण हिंसाचारात किमान ११ जण गंभीर जखमी झाले आहेत. गुरुद्वाराच्या व्यवस्थापन समितीची निवडणूक आणि निधीच्या नियंत्रणावरून निर्माण झालेल्या वादातून हा संघर्ष झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. या घटनेमुळे स्थानिक शीख समुदायात आणि परिसरात खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, गुरुद्वारामध्ये सकाळची सेवा सुरू होण्यापूर्वीच अचानक हिंसाचाराला सुरुवात झाली. सुमारे ४० जणांचा समावेश असलेल्या दोन गटांनी एकमेकांवर हल्ला चढवला. सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या व्हिडिओंमध्ये दिसत असल्याप्रमाणे,



या संघर्षात केवळ लाथाबुक्क्यांचाच नाही, तर किरपाण (तलवार), चाकू आणि पेपर स्प्रेचा सर्रास वापर करण्यात आला. प्रत्यक्षदर्शींच्या म्हणण्यानुसार, गर्दीत एका व्यक्तीने बंदुकीतून गोळीबारही केला, ज्यामुळे परिसरात घबराट पसरली.

एका ५६ वर्षीय प्रत्यक्षदर्शी व्यक्तीने दिलेल्या माहितीनुसार, हा हल्ला पूर्वनियोजित होता. त्याने सांगितले की, "सेवा सुरू होण्यापूर्वीच हल्लेखोरांनी अचानक पेपर स्प्रेचा मारा केला आणि त्यानंतर एकाने पिस्तूल बाहेर काढून गोळीबार केला. अनेकांच्या हातात धारदार चाकू आणि तलवारी होत्या." अचानक झालेल्या या हल्ल्यामुळे अनेक भाविकांनी जीव वाचवण्यासाठी गुरुद्वाराबाहेर धाव घेतली. सुदैवाने, या हिंसाचारात कोणाचाही मृत्यू झालेला नाही, मात्र ११ जण जखमी झाले आहेत.

गुरुद्वाराच्या माजी आणि विद्यमान व्यवस्थापन समितीमध्ये गेल्या अनेक दिवसांपासून वाद सुरू होता. नवीन व्यवस्थापन समितीच्या निवडीवरून दोन्ही गटांत तीव्र मतभेद होते, गुरुद्वाराला मिळणाऱ्या देणगीवर आणि निधीच्या वापरावर कोणाचे नियंत्रण असावे, यावरून हा संघर्ष विकोपाला गेला होता. गुरुद्वारामधील निर्णयांमध्ये कोणाचे शब्द अंतिम असावेत, यावरून हे दोन्ही गट एकमेकांसमोर उभे ठाकले होते. ही या वादाची मुख्य कारणं असल्याचे समजते. घटनेची माहिती मिळताच जर्मनीच्या विशेष पोलीस दलाने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सर्व ११ जखमींवर घटनास्थळीच प्राथमिक उपचार करण्यात आले असून काही जणांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. पोलिसांनी एका संशयिताला ताब्यात घेतले असून इतरांची ओळख पटवण्याचे काम सुरू आहे. घटनास्थळी काडतुसांच्या रिकाम्या पुंगळ्या सापडल्या आहेत. प्राथमिक तपासानुसार, गोळीबारासाठी वापरलेले शस्त्र हे 'ब्लँक-फायरिंग पिस्तूल' असू शकते, असा अंदाज आहे. सध्या या परिसरात मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला असून, घटनेचे गांभीर्य लक्षात घेता पुढील तपास सुरू आहे. या घटनेमुळे परदेशातील भारतीय समुदायामध्ये सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

## "वेस्टर्न स्टाईलने प्रपोज करते" सांगून प्रेयसीने प्रियकराचे हात-पाय बांधले; अंगावर रॉकेल ओतून जिवंत जाळले

**बंगळुरू/वृत्तसंस्था**

बंगळुरूमधून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. 'वेस्टर्न स्टाईल' प्रपोजच्या नावाखाली प्रेयसीने प्रियकराला जिंवत जाळल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. बंगळुरूच्या अंजनापुरा भागात ही घटना घडली. प्रियकराने दुर्लक्ष केल्याच्या रागातून प्रेयसीने त्याचा खून केल्याचे पोलिसांच्या प्राथमिक तपासात उघड झाले आहे.

मिळालेल्या अधिकच्या माहितीनुसार, संशयित आरोपी महिला, प्रेमा हिने घरात कोणी नसताना तिचा प्रियकर किरणला आपल्या घरी बोलावले होते. "वेस्टर्न स्टाईल" (पाश्चात्य पद्धतीनुसार) प्रपोज करायचे आहे, असे तिने किरणला सांगितले. प्रेमाने प्रियकर किरणचे हात-पाय दोरीने बांधले आणि त्याच्या डोळ्यांवर पट्टी बांधली. किरणने प्रश्न विचारला पण हाच प्लॅन असल्याचे तिने सांगितले.



"वेस्टर्न स्टाईल" प्रपोजचा भाग असल्याचे सांगत तिने किरणला डोळ्यांवर पट्टी आणि हात-पाय दोरीने बांधले असताना अंगावर रॉकेल ओतले आणि त्याला आग लावून दिली. आगीत होरपळल्यामुळे किरणचा जागीच मृत्यू झाला. हात-पाय दोरीने बांधले असल्याने त्याला हालचाल करता आली नाही. अखेर त्याचा मृत्यू झाला. प्रेमा आणि किरण हे दोघे राजाजीनगरमधील एका टेलिकॉम स्टोअरमध्ये एकत्र काम करत होते.

प्रियकर गेल्या काही दिवसांपासून प्रेमाकडे दुर्लक्ष करत होता. याचा प्रचंड राग संशयित प्रेमाच्या मनात होता. किरण वारंवार इग्नोर करत असल्यामुळे तिने टोकाचे पाऊल उचलले, असे पोलीस तपासात समोर आले आहे. दरम्यान, पोलिसांनी या घटनेत पूर्वनियोजित कट असल्याचा संशय व्यक्त केला आहे. प्रेमाने घरात आधीच रॅाकेलचा कॅन तयार ठेवले होते. शिवाय तिने या घटनेचे चित्रीकरण आपल्या मोबाईल केल्याचा आरोप देखील केला जात आहे. पोलिसांनी संशयित प्रेमाला अटक केली असून तिच्यावर खूनाचा गुन्हा दाखल केला आहे. पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

दोघांमध्ये प्रेमसंबंध होते, मात्र गेल्या काही दिवसांपासून त्यांच्यात तणाव होता. किरण मला टाळत होता, माझ्याकडे लक्ष देत नव्हता, किरण आपल्याला टाळत असल्याच्या रागातून प्रेमाने हे कृत्य केल्याचा संशय आहे. याप्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून आरोपी महिलेला ताब्यात घेतले आहे. वरिष्ठ पोलीस अधिकारी या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

## नागपुरात ८ जणांकडून दोघांवर प्राणघातक हल्ला, ८ जणांवर दंगलीचा गुन्हा

**नागपूर/वृत्तसंस्था**

कामठी मार्गावरील ऑटोमोटिव्ह चौकात सिगारेटवरून झालेल्या वादानंतर सोमवारी मध्यरात्री ८ जणांनी दोघांवर प्राणघातक हल्ला चढवला. यात दोघांना गंभीर दुखापती झाल्या असून त्यांच्यावर मेयो रुग्णालयात उपचार सुरू आहे.

मेट्रोस्थानकाच्या खालीच ही घटना घडल्याने खासगी प्रतिष्ठानांच्या सीसीटीव्हीत हा संपूर्ण घटनाक्रम कैद झाला. कोणीतरी तो समाजमाध्यमांवर व्हायरल केला. त्या आधारे पोलीस हल्लेखोरांचा शोध घेत आहेत. मुस्लिम समुदायातील दोन गटांमध्ये मद्य प्राशन केल्यानंतर सिगारेटवरून हा वाद उफाळून आला. या प्रकरणाची गंभीर दखल घेत कपिलनगर पोलिसांनी हल्लेखोरांवर प्राणघातक हल्ल्यासह दंगलीचा गुन्हा दाखल करत त्यातील दोघांना अटक केली. अन्य सहा जणांचा शोध घेतला जात आहे. कपिलनगर पोलीस हद्दीतील टेकानाका मेट्रोस्टेशनजवळ सोमवारी मध्यरात्री दिडच्या सुमारास ही घटना घडली. शेख अखिल शेख जलील आणि मोहम्मद आसिफ शेख बशीर अशी जखमींची नावे आहेत. हे दोघेही चौकातल्या मद्यालयात मद्य प्राशन करून सिगारेट ओढत उभे होते. त्याच वेळी ओळखीतल्या दुसऱ्या गटातील ८ जण तिथे आले. या सर्वांनीही मद्य प्राशन केले होते. दरम्यान त्यातील अजहर शेख, हुसैन उर्फ अरमान लोचा, पिंटू उपाध्याय, चिंटू, इरफान रमझान खान, राजा हिरोती या आठपैकी एकाने सिगारेट मागितली. त्यावरून दोन्ही गटांत मद्याच्या नशेत वाद झाला. शिवीगाळीननंतर प्रकरण हाणामारीपर्यंत पोचले. यात दुसऱ्या गटातील आठही जणांनी शेख अखिल आणि मोहम्मद आसिफ या दोघांवर धारदार शस्त्राने वार केले. या हल्ल्यानंतर आठही जण पसार झाले. माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळ गाठत जखमींना मेयो रुग्णालयात दाखल केले. त्यानंतर हल्लेखोरांवर प्राणघातक हल्ला आणि दंगलीचा गुन्हा दाखल करत पोलिसांनी दोन जणांना ताब्यात घेतले.

# परतवाडा लैंगिक शोषण प्रकरण : अयान अहमदसह आरोपींचा पोलीस कोठडीतील मुक्काम वाढला, आता 'या' तारखेपर्यंत...

**अमरावती/वृत्तसंस्था**

परतवाडा येथील लैंगिक शोषण आणि आक्षेपार्ह चित्रफिती प्रसारित करण्याच्या प्रकरणात मुख्य आरोपी अयान अहमदसह चार आरोपींच्या पोलीस कोठडीत वाढ करण्यात आली आहे. न्यायालयाने त्यात अधिक चौकशीसाठी २७ एप्रिल २०२६ पर्यंत मुदतवाढ दिली आहे. मोबाईल मधील डेटा आरोपींच्या समक्ष तपासण्यासाठी तसेच आर्थिक व्यवहार तपासण्यासाठी सरकारी पक्षाने पोलीस कोठडी वाढवून मागितली होती.

परतवाडा लैंगिक शोषण प्रकरणात आतापर्यंत आठ जणांना अटक करण्यात आली आहे. त्यापैकी आरोपी अयान अहमद तन्वीर अहमद, उजैर खान इकबाल खान, मो. साद मो. साबिर , तबरेज खान तसलीम खान यांची पोलीस



कोठडी न्यायालयाने वाढवली आहे.

परतवाडा लैंगिक शोषण प्रकरणात मुख्य आरोपी अयान अहमदसह तीन आरोपींना अचलपूर जिल्हा सत्र न्यायालयात आज हजर करण्यात आले. सुनावणीदरम्यान न्यायालयाने पोलिसांना आणखी पुरावे गोळा करून न्यायालयासमोर सादर करण्याबाबत सांगितले. सरकारी वकिलांनी आरोपींना अधिक तपासासाठी पोलीस कोठडी देण्याची मागणी केली. जप्त मोबाईलमधील रिकव्हर केलेला डेटा आरोपींच्या समक्ष तपासायचा असल्याचे सरकारी पक्षाने सांगितले. आरोपींच्या बँक खात्यांची माहिती, आर्थिक व्यवहारांची चौकशी करणे आवश्यक असल्याचेही नमूद करण्यात आले. आरोपींच्या वकिलांनी पोलिसांच्या मागणीला विरोध करत सात दिवसांच्या पोलीस कोठडीतही ठोस पुरावे सापडले नसल्याचा दावा केला.

दरम्यान, या प्रकरणात आठ पीडितांपैकी एका १५ वर्षीय मुलीने पोलिसांसमोर जबाब देण्याची सहमती दर्शविल्यानंतर विशेष तपास पथकातील महिला पोलीस अधिकारी तसेच महिला व बाल कल्याण अधिकाऱ्यांसमोर तिचा जबाब नोंदविण्यात आला. त्यात तिचे लैंगिक शोषण झाले नसल्याचे समोर आले. तो जबाब मूळ गुन्ह्याच्या तपासात जोडण्यात आला आहे. या प्रकरणात आरोपींकडून जप्त करण्यात आलेले ५ मोबाइल व्यतिरिक्त जप्त करण्यात आलेले इतर ६ मोबाइल, १ लॅपटॉप, १ टॅब आणि १ हार्ड डिस्क त्वरित विश्लेषणासाठी न्यायवैद्यक प्रयोगशाळेत पाठविण्यात आले आहेत.

आरोपींकडून जप्त करण्यात आलेल्या मोबाइलमध्ये ८ पीडित मुलींच्या १८ चित्रफिती आणि ३९ छायाचित्रे आढळून आली. या चित्रफिती इतरांना प्रसारित करणाऱ्या इतर ७ आरोपींनादेखील तपासादरम्यान अटक करण्यात आली. पीडित मुलींनी कोणत्याही दडपणाला किंवा भीतीला बळी न पडता धैर्याने समोर येऊन आपला जबाब नोंदवावा. जबाब देण्यासाठी पुढे येणाऱ्या प्रत्येक पीडितेची ओळख पूर्णपणे गुप्त ठेवण्याची कायदेशीर खबरदारी पोलिसांकडून घेतली जात आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# अभिषेकचं वादळी शतक; मलिंगा-हर्षची मोलाची साथ, हैदराबाद सुसाट

■ मुंबई, वृत्तसंस्था :

आयपीएल २०२६ स्पर्धेतील ३१ वा सामना सनरायझर्स हैदराबाद आणि दिल्ली कॅपिटल्स या दोन्ही संघांमध्ये पार पडला. या सामन्यात दिल्लीने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. प्रथम फलंदाजी करताना हैदराबादकडून अभिषेक शर्माने तुफानी शतकी खेळी केली. त्याला शेवटी हेनरिक क्लासेनची चांगली साथ मिळाली. हैदराबादने प्रथम फलंदाजी करताना २ गडी बाद २४२ धावांचा डोंगर उभारला होता. या धावांचा बचाव करताना हैदराबादच्या गोलंदाजांनीही दमदार गोलंदाजी केली. इशान मलिंगाने सर्वाधिक ४ गडी बाद केले. दिल्लीचा संघ विज्यापासून ४७ धावा दूर राहिला.

दिल्ली कॅपिटल्सला हा सामना जिंकण्यासाठी २४३ धावा करायच्या होत्या. सलामीला आलेला पथूम निसांका अवघ्या ८ धावांवर माघारी परतला. केएल राहुलने डाव सांभाळण्याचा प्रयत्न केला. पण साकिब हुसेनने त्याला ३७ धावांवर माघारी धाडलं. गोलंदाजीत फ्लॉप ठरलेल्या नितीश राणाने फलंदाजीत कसर काढली. त्याने ५७ धावांचे योगदान दिले. गेल्या सामन्यातील हिरो डेव्हिड मिलर या सामन्यात शून्यावर माघारी परतला. ट्रिस्टन स्टब्सने २७ धावा केल्या. तर इम्पॅक्ट प्लेअर म्हणून फलंदाजीला आलेला आशुतोष शर्मा अवघ्या १४ धावांवर बाद झाला. दिल्लीकडून समीर रिझवीने ४१ धावांची खाकी केली. हैदराबादला २० षटकांअखेर९ गडी बाद १९५ धावा करता आल्या. या सामन्यात सनरायझर्स हैदराबादचा संघ नाणेफेक गमावून प्रथम फलंदाजी करण्यासाठी आला होता. हैदराबादकडून ट्रॅव्हिस हेड आणि अभिषेक शर्माची जोडी मैदानावर आली. दोघांनी मिळून दमदार सुरुवात केली. पहिल्या विकेटसाठी दोघांनी ९७ धावा जोडल्या. यादरम्यान हेड ३० धावा करून माघारी परतला. त्यानंतर फलंदाजीसाठी आलेल्या इशान किशनने १३ चेंडूत ताबडतोड २५ धावांची खेळी केली. शेवटी अभिषेक शर्मा आणि हेनरिक क्लासेनने मिळून दिल्लीच्या गोलंदाजांची चांगलीच धुलाई केली. ही जोडी शेवटपर्यंत उभी राहिली आणि संघाची धावसंख्या २ गडी बाद २४२ धावांपर्यंत पोहोचवली. अभिषेक शर्माने ४७ चेंडूत आपलं शतक पूर्ण केलं. त्याने ६८ चेंडूत नाबाद १३५ धावांची खेळी केली. तर हेनरिक क्लासेनने अवघ्या १३ चेंडूत ३७ धावा केल्या.



## अभिषेक शर्माने मोडला विराट कोहलीचा सर्वात मोठा रेकॉर्ड! अशी कामगिरी करणारा पहिलाच फलंदाज

■ नवी दिल्ली/वृत्तसंस्था

आयपीएल २०२६ स्पर्धेतील ३१ वा सामना सनरायझर्स हैदराबाद आणि दिल्ली कॅपिटल्स या दोन्ही संघांमध्ये सुरू आहे. हैदराबादच्या राजीव गांधी आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर सुरू असलेल्या सामन्यात दिल्ली कॅपिटल्सने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करण्यासाठी आलेल्या हैदराबादकडून ट्रॅव्हिस हेड आणि अभिषेक शर्मा यांनी मिळून दमदार सुरुवात करून दिली. दोघांनी पहिल्या विकेटसाठी एकूण ९७ धावा जोडल्या. हेड ३७ धावांवर बाद होऊन माघारी परतला. पण त्यानंतर अभिषेकने दिल्लीच्या गोलंदाजांचा चांगलाच समाचार घेतला. यादरम्यान त्याने अवघ्या ४७ चेंडूत आपलं शतक पूर्ण केलं. यादरम्यान त्याने विराट कोहलीचा मोठा रेकॉर्ड मोडून काढला आहे.



सनरायझर्स हैदराबादकडून डावाची सुरुवात करणारा अभिषेक शर्मा आपल्या आक्रमक फलंदाजीसाठी ओळखला जातो. आतापर्यंत त्याने दमदार कामगिरी केली आहे. आयपीएल २०२६ स्पर्धेतील हे त्याचं पहिलंच शतक आहे. त्याने डावाची सुरुवात करताना २५ चेंडूत आपलं अर्धशतक पूर्ण केलं. त्यानंतर ४७ चेंडूत दमदार शतक झळकावलं. यासह त्याने भारतासाठी सर्वाधिक टी-२० शतकं झळकावण्याच्या रेकॉर्डमध्ये विराट कोहलीच्या रेकॉर्डची बरोबरी केली आहे.

भारतासाठी सर्वाधिक टी -२० शतकं झळकावण्याच्या रेकॉर्डमध्ये अभिषेक शर्मा विराटसह संयुक्तरित्या अव्वल स्थानी पोहोचला आहे. दोघांच्या नावे प्रत्येकी ९-९ शतकं झळकावण्याची नोंद आहे. तर रोहित शर्माच्या नावे ८ शतकं झळकावण्याची नोंद आहे. या यादीत तिसऱ्या स्थानी असलेल्या इशान किशनच्या नावे ७ शतकं झळकावण्याची नोंद आहे. संजू सॅमसन आणि केएल राहुल यांनी देखील प्रत्येकी ७-७ शतकं झळकावली आहेत. पण सर्वात जलद ९ शतकं झळकावणाऱ्या फलंदाजांच्या यादीत अभिषेक शर्मा अव्वल स्थानी पोहोचला आहे. त्याने १८४ व्या डावात ९ शतकं झळकावली आहेत. विराट कोहलीने ४०३ डावात हा कारनामा केला होता. तर रोहितने ४५४ डावात ८ शतकं झळकावली आहेत.

## म्हात्रे IPL मधून बाहेर; १८ चेंडूत शतक झळकावणाऱ्या फलंदाजाला संधी

■ मुंबई/वृत्तसंस्था

ऋतुराज गायकवाडच्या नेतृत्वाखाली खेळणाऱ्या चेन्नई सुपर किंग्ज संघाला या हंगामात हवी तशी कामगिरी करता आलेली नाही. पण गेल्या ३ पैकी २ सामन्यांमध्ये विजय मिळवून चेन्नईने दमदार पुनरागमन केलं आहे. सर्वकाही सुरळीत सुरू असताना चेन्नई सुपर किंग्ज संघाचं टेन्शन वाढवणारी बातमी समोर आली आहे. संघातील प्रमुख फलंदाज आयुष म्हात्रे हॅमस्ट्रिंगच्या दुखापतीमुळे आयपीएल २०२६ स्पर्धेतून बाहेर पडला आहे. दुखापतग्रस्त झाल्यानंतर तो ३ आठवड्यात संघात पुनरागमन करणार असल्याची चर्चा रंगली होती. पण आता तो थेट स्पर्धेतून बाहेर झाल्याची माहिती मिळत आहे. आता चेन्नई सुपर किंग्ज उर्वरित सामन्यांसाठी कोणाला संघात स्थान देणार, हे पाहणं महत्वाचं ठरणार आहे. दरम्यान दरम्यान संघात आधीपासून एक असा फलंदाज आहे, जो आयुष म्हात्रेसारखीच तुफान फटकेबाजी करतो.

आयुष म्हात्रे स्पर्धेतून बाहेर पडल्यानंतर, आता उर्विल पटेलला संधी मिळण्याची शक्यता वाढली आहे. उर्विल पटेलने देशांतर्गत क्रिकेटमध्ये दमदार कामगिरी केली आहे. सय्यद मुश्ताक अली ट्रॉफी स्पर्धेत त्याने अवघ्या २८ चेंडूत वेगवान शतक झळकावलं होतं. मोठे फटके खेळण्यासाठी ओळखल्या जाणाऱ्या उर्विल पटेलला प्लेईंग ११ मध्ये स्थान मिळत नव्हतं. पण आता आयुष म्हात्रे संघाबाहेर झाल्यानंतर उर्विल पटेलला प्लेईंग ११ मध्ये स्थान मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

आयुष म्हात्रेने गेल्या काही सामन्यांमध्ये दमदार कामगिरी केली आहे. पण सनरायझर्स हैदराबाद संघाविरुद्ध झालेल्या सामन्यादरम्यान त्याला हॅमस्ट्रिंगचा त्रास जाणवला. त्यामुळे काही वेळासाठी सामना थांबवण्यात आला होता. फिजियो आले, तपासणी केली, त्यानंतर त्याने फलंदाजी करणं सुरू ठेवलं.

# सूर्यवंशी, शर्मा, प्रियांश : पॉवरहिटर्स ज्यांनी केलं क्रिकेट गोल्फमय

■ सेंट लुइस/वृत्तसंस्था

यंदाच्या आयपीएल हंगामात युवा शिलेदारांनी फटकेबाजीला नवा आयाम दिला आहे. युवा शिलेदार पदलालित्यापेक्षा बॅटस्विंगवर भर देतात. शरीराचं ठोस संतुलन आणि हात फैलावत फटकेबाजीसाठी मुक्त वापर ही त्यांची वैशिष्ट्यं आहेत. गोल्फ प्रशिक्षक आदित्य कानिटकर यांनी बॅट स्विंग, पॉवरहिटिंग यासंदर्भात अनेक गोष्टी उलगडून सांगितल्या.

'वैभव सूर्यवंशी आणि हेनरिच क्लासन षटकार लगावताना गोल्फ स्टान्स घेतात. क्लासन उंच आहे. निसर्गाची देणगी असलेल्या लांब हातांमुळे त्याच्या फटक्यांना जोर मिळतो. क्लासनच्या तुलनेत वैभवची उंची कमी आहे पण त्याचं शरीर अतिशय वेगाने हलतं. त्याचं हँडआय कोऑर्डिनेशन अचंबित करणारं आहे. बॅटस्विंगला याची जोड मिळत असल्याने तो मारते ते फटके थक्क करणारे असतात. हेडस्टार्ट विलक्षण असतो. वैभव गोल्फ खेळू लागला तर कोसो दूर चेंडू फेकून देईल'.

'गोल्फ आणि क्रिकेटमधलं साम्य म्हणजे ज्या पद्धतीने शरीराचा वरचा भाग आणि खालचा भाग यांची हालचाल होते. जे पल्लेदार षटकार मारतात त्यांना शरीराचं संतुलन कसं राखावं याची क्लृप्ती जमली आहे. क्रिकेटमध्ये चेंडू स्थिर नसतो, गोल्फमध्ये असतो. म्हणूनच षटकार हाणणे हे खास कौशल्य आहे. पण त्याला जे तंत्र लागतं ते गोल्फमधलं आहे'.

बॅटचा वेग आणि हातांचा वापर यांची चर्चा होते. पण गोल्फसारखा स्टान्स घेऊन फटकेबाजी करण्याचं तंत्र वेगळं असतं. यामध्ये शरीराच्या खालच्या भागाचा पायाचा वापर करून ऊर्जा तयार केली जाते. गोल्फमध्ये याला ग्राऊंड फोर्स असं म्हणतात. ही शक्ती पोट,बरगड्या यांच्याकडे आणि त्यानंतर हाताकडे संक्रमित होते.

'फलंदाज स्क्वॅट पद्धतीने बसतो आणि ग्राऊंड फोर्सचा वापर करून फटका खेळतो.



पाय-पोटऱ्या यांचा वापर होतो. म्हणूनच ऋतुराज गायकवाड, रिंकू सिंह प्रचंड ताकदवान नाहीत पण ते हेनरिच क्लासनसारखे जोरकस फटके लगावतात. काहीजणांचा उजवा पाय ताकदवान असतो काहींचा डावा. महेंद्रसिंग धोनी उजव्या पायाच्या जोरावर मोठे फटके खेळतो'. 'गोल्फमध्ये १२० किमी ताशी स्विंग निर्माण होते. टी२० प्रकाराच्या आगमनानंतर ग्राऊंड फोर्सचा उपयोग करून षटकार मारण्यात येत आहेत. शरीराचा वरचा भाग, हात यांची ताकद लागतेच पण पाय-पोटऱ्या यांचं बळ महत्त्वाचं ठरतंय. निवडसमितीचे प्रमुख आणि माजी अष्टपैलू खेळाडू अजित आगरकर काटक शिडशिडीत असे. तरीही षटकार लगावण्यात ते माहीर होते'.

'कपिल देव यांनी पॉवरहिटिंगचा पाया घातला म्हटलं तर वावगं ठरणार नाही. युवराज सिंगने ग्राऊंड फोर्स पद्धतीने फटकेबाजीला न्याय दिला. स्टीव्हन स्मिथ, रिकी पॉन्टिंग, ग्लेन मॅक्सवेल यामध्ये प्रवीण आहेत.

**अभिषेक शर्मा :** ब्रायन लारा आणि युवराज सिंग या दिग्गजांच्या मार्गदर्शनात अभिषेकच्या फटकेबाजीला सुरेख पैलू पडले आहेत. डावखुरा अभिषेक बॅटवरची ग्रिप बदलतो आणि लॉन्ग ऑन लॉन्ग ऑफ पट्ट्यात मनमुराद फटकेबाजी करतो. कव्हरच्या डोक्यावरून इनसाईड आऊट पद्धतीने चेंडू भिरकावून द्यायला त्याला आवडतं.

**वैभव सूर्यवंशी :** भारतीय क्रिकेटविश्वातला नवा तारा असं वर्णन होणाऱ्या वैभव सूर्यवंशीच्या फटकेबाजीची ताकद हालचालीपेक्षा बॅटस्पीडमध्ये आहे. जोरकस फटके मारण्यासाठी वैभव बॅट खुलेपणाने घुमवतो. मात्र असं करताना त्याची पावलं क्रीझमध्ये पक्की असतात. लॉन्गऑन ते स्क्वेअर लेग पट्ट्यात तो फटकेबाजी करतो. पदलालित्यापेक्षा बॅटला स्वैर घुमवून षटकार खेचण्यावर त्याचा भर असतो.

**प्रियांश आर्य :** दिल्ली प्रीमिअर लीगच्या माध्यमातून चमकलेला प्रियांश बॅटस्विंगच्या बळावर प्रतिस्पर्धी गोलंदाजांची कत्तल करतो. डाऊन द ट्रॅक न जाता तसंच पदलालित्याचा वापर करण्याऐवजी एका जागी उभं राहून तडाखेबंद फटकेबाजी करण्यावर त्याचा भर असतो. तो प्रामुख्याने ऑनसाईडला फटकेबाजी करतो. पिकअप फ्लिक फटका खेळत फाईन लेग क्षेत्रात धावा फटकावण्यात तो माहीर आहे.

# लाईव्ह परफॉर्मन्समधील 'त्या' कृतीमुळे गायिकेवर संतापले नेटकरी; नेमकं काय घडलं?

धुरंधर चित्रपटातील आदित्य धरच्या दिग्दर्शनाचे सर्वत्र कौतुक झाले. त्याचबरोबर कथा, संवाद आणि कलाकारांच्या अभिनयाचीसुद्धा तितकीच चर्चा झाली. कथा, अभिनय, दिग्दर्शनाबरोबरच प्रेक्षकांनी चित्रपटातील गाण्यांचेसुद्धा भरभरून कौतुक केले. 'धुरंधर'चे दोन भाग प्रेक्षकांच्या भेटीला आले आहेत. त्यापैकी 'धुरंधर'मधील गाणी अजूनही लोकप्रिय आहेत.

'धुरंधर' चित्रपटातील लोकप्रिय गाण्यांपैकी एक म्हणजे 'शरारत' हे गाणं. पार्श्वगायिका जॅस्मिन सँडलासने हे गाणे गायले आहे. या गाण्यामुळे ती चांगलीच चर्चेत आली. आपल्या गाण्यांनी चर्चेत राहणारी गायिका सध्या तिच्या एका परफॉर्मन्समुळे सोशल मीडियावर टीकेची धनी बनली आहे. लाइव्ह कॉन्सर्टमध्ये तिने केलेल्या कृतीमुळे





नेटकरी तिच्यावर संतापले आहेत. जॅस्मिन सँडलासचा नुकताच अहमदाबादमध्ये एक कॉन्सर्ट शो पार पडला. मात्र, या शोमधील एका व्हिडीओमुळे तिच्यावर प्रचंड टीका होत आहे. या लाइव्ह कॉन्सर्टमध्ये जॅस्मिनने गाणे न गाता, केवळ 'लिप-सिंक' केल्याचे नेटकऱ्यांनी म्हटले आहे.

१९ एप्रिल रोजी अहमदाबादमध्ये झालेल्या या कॉन्सर्टमध्ये जॅस्मिनने तिच्या 'शरारत' या लोकप्रिय गाण्यावर परफॉर्मन्स केला. गाण्याला सुरुवात करण्यापूर्वी तिने स्वतःच्या अंगावर पाणी ओतून घेतले. नेटकऱ्यांना गायिकेची ही कृती अजिबातच आवडलेली नाही. यावेळी परफॉर्मन्सदरम्यान अनेक वेळा तिने माईक खाली धरलेला असतानाही पार्श्वभूमीवर गाणे सुरूच होते. ते पाहून नेटकऱ्यांनी तिला चांगलेच ट्रोल केले आहे. लाइव्ह कॉन्सर्ट असूनही तिने प्रत्यक्षात गाणे गायले नसल्याने प्रेक्षक संतापले आहेत.

सोशल मीडियावरील व्हायरल व्हिडीओखालील कमेंट्समध्ये नेटकऱ्यांनी तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केल्या आहेत. एकाने "हा काय मूर्खपणा आहे?", असे म्हटले आहे. तर दुसऱ्याने, "लाइव्ह कॉन्सर्टमध्ये तरी किमान लाइव्ह गायला हवे होते", असे स्पष्ट मत व्यक्त केले आहे. आणखी एकाने टीका करीत, "मागे गाणे वाजत आहे आणि ही फक्त 'लिप सिंक' करत आहे, याला परफॉर्मन्स म्हणायचे का?" असे स्पष्टपणे म्हटले आहे. अशा अनेक प्रतिक्रियांमधून नेटकऱ्यांनी गायिकेवर आपली नाराजी आणि राग व्यक्त केला आहे. मात्र, काही चाहत्यांनी तिच्या बाजूने बोलत 'हा शो खूपच धमाकेदार होता', अशा शब्दांत तिचे कौतुक केले आहे.

जॅस्मिनने सलमान खानच्या 'किक' चित्रपटातील 'यार ना मिले' या गाण्याद्वारे बॉलीवूडमध्ये पदार्पण केले होते. त्यानंतर तिने 'इल्लीगल वेपन २.०', 'मुंज्या'मधील 'तरस' व 'रेड २'मधील 'नशा' यांसारखी अनेक सुपरहिट गाणी दिली. तसेच तिने 'धुरंधर' चित्रपटातील तिची गाणी खूप गाजत आहेत. चित्रपटाच्या पहिल्या भागात तिने 'धुरंधर'चे शीर्षक गीत आणि 'शरारत' हे आयटम साँग गायले होते. त्यानंतर 'धुरंधर : द रिव्हेंज' या दुसऱ्या भागात तिने गायलेल्या 'जाइये संजना' या गाण्यालाही प्रेक्षकांची पसंती मिळत आहे.

## "तिने ठरवलं होतं...", तन्वी कोलते जिंकल्यावर राकेश बापटचं मत! दोघे 'या' जागी जाणार

बिग बॉस मराठी'च्या सहाव्या पर्वाचा ग्रँड फिनाले नुकताच पार पडला. तन्वी कोलते या पर्वाची विजेती झाली असून अभिनेता राकेश बापट यंदा उपविजेता ठरला आहे. फिनाले पार पडल्यावर तन्वी Deserving विजेती नाहीये असं अनेकांचं म्हणणं होतं. याबाबत राकेश बापटने नुकत्याच दिलेल्या मुलाखतीत खुलासा केला आहे.

राकेशचं मत विचारल्यावर तो म्हणाला, "मी या रिझल्टबद्दल अतिशय खूश आहे. मला काहीच प्रॉब्लेम नाहीये. कारण, आमचं एकच म्हणणं आहे की, जो कोणी विजेता होईल तो 'काटा' ग्रुपचा व्हावा. तन्वीमध्ये खूप जिद्द आहे. तिचं पहिल्या दिवसापासून एकच ध्येय होतं ते म्हणजे...मला ट्रॉफी जिंकायचीये. तिने जे ठरवलं ते तिने करून दाखवलं...शंभर दिवसांनी ती ट्रॉफी जिंकली. ज्या लोकांचं व्हिजन स्पष्ट असतं असे लोक मलाही खूप आवडतात...अशी आपल्या ध्येयावर लक्ष केंद्रीत करणारी फार क्वचित लोक असतात. ती अजिबात भरकटली नाही...तिने आपलं ध्येय पूर्ण केलं."

राकेश पुढे म्हणला, "तन्वीमध्ये किती जिद्द आहे हे मी गेल्या शंभर दिवसांत पाहिलंय. शेवटी आपण म्हणतो ना..जो जीता वही सिकंदर! आता ती Deserving आहे की नाही याबद्दल सांगायचं झालं, तर ती नक्कीच ही 'बिग बॉस मराठी'ची ट्रॉफी Deserve करते."

"शो संपल्यावर कोणाबरोबर मैत्री कायम ठेवणार? दिलेल्या मुलाखतीत राकेश म्हणाला, जो आमचा काटा ग्रुप आहे...त्यांच्याबरोबर





माझी मैत्री कायम राहणार आहे. तन्वी माझी लहान बहीण आहे, दिपाली माझी खूप छान मैत्रीण झालीये, प्रभू, रेवा...आम्ही सगळ्यांनी एकत्र कोकणात जायचं असं ठरवलं आहे. आम्हाला तन्वीच्या गावी जायचं आहे. तन्वी आणि मी आम्ही दोघंही स्वामीभक्त आहोत...त्यामुळे ट्रॉफी घेऊन आता आम्ही अक्कलकोटला सुद्धा जाणार आहोत. खरी नाती खूप क्वचित जोडली जातात पण, या घरात मला अनेक जवळचे लोक भेटले." असं मत राकेशने व्यक्त केलं.

दरम्यान, बिग बॉस मराठीच्या सहाव्या पर्वात तन्वीने बाजी मारली असून राकेश या सीझनचा उपविजेता ठरला आहे. विशाल कोटीयन तिसऱ्या स्थानी, अनुश्री माने चौथ्या स्थानी तर, दिपाली सय्यद पाचव्या स्थानी एलिमिनेट झाल्याचं पाहायला मिळालं.

## डायरेक्टरने रंग पाहून घरी पाठवलं

अभिनेते विनोद सूर्यवंशी सध्या सोशल मीडियावर चांगलेच चर्चेत आहे. त्यांना 'पंचायत' मुळे खूप लोकप्रियता मिळाली. त्यांचा इंडस्ट्रीतील संघर्ष जाणून घेऊयात. सिद्धार्थ कन्नन यांच्याशी संवाद साधताना विनोद सूर्यवंशी यांनी आपल्या संघर्षाच्या काळाविषयी उलगडा केला. विनोद सूर्यवंशी यांना आपल्या दिसण्यावरून अनेकदा ट्रोल केले गेले आणि त्यांच्या हातून अनेक भूमिका गेल्या.



विनोद यांनी मुलाखतीत सांगितले की, "माझ्या दिसण्यामुळे मला अनेकदा नाकारले गेले. जेव्हा मी टीव्ही मालिकांसाठी ऑडिशन्स द्यायचो, तेव्हा त्यांना अनेकदा 'श्रीमंत दिसणारा' चेहरा हवा असायचा. अगदी एखाद्या भिकाऱ्याची भूमिका साकारण्यासाठीही त्यांना श्रीमंत दिसणाराच कलाकार हवा असायचा. 'तुम्ही आमच्या निकषांमध्ये बसत नाही,' असे सांगून मला नाकारले जायचे..." पुढे विनोद म्हणाला की, "एका मालिकेत 'घरकाम करणाऱ्या नोकराची' भूमिका साकारण्यासाठी माझी निवड झाली होती. कास्टिंग टीमने माझ्या नावावर शिक्कामोर्तब केला आणि मी शूटिंगच्या ठिकाणी वेळेवर पोहोचलो. पण जेव्हा त्या मालिकेच्या क्रिएटिव्ह डायरेक्टर तिथे आल्या, तेव्हा त्यांनी विचारले, 'हा कोण आहे?' जेव्हा त्यांना सांगण्यात आले की, मी त्या भूमिकेसाठी निवडलेला कलाकार आहे, तेव्हा त्या म्हणाल्या, 'नाही, हे चालणार नाही. आम्हाला गोऱ्या रंगाचा कलाकार हवा आहे. हा तर सावळ्या रंगाचा आहे... याला परत पाठवून द्या." चित्रपटसृष्टीविषयी बोलताना ते म्हणाले की, "मी चुकूनच चित्रपटसृष्टीत आलो. माझ्या एका मित्राने मला फोन केला आणि सांगितले की, एखाद्या चित्रपटाच्या चित्रीकरणादरम्यान गर्दीमध्ये उभे राहून तू ५०० रुपये कमवू शकतोस.मला ही गोष्ट खूप आवडली की, मला इथे सकाळचा नाश्ता, दुपारचे जेवण आणि दिवसाच्या शेवटी ५०० रुपये मिळायचे. मी यापूर्वी केलेल्या कोणत्याही कामापेक्षा हे काम मला अधिक चांगले वाटले. त्यामुळेच मी हे काम पुढेही चालू ठेवण्याचा निर्णय घेतला आणि अशा प्रकारे मी 'ज्युनियर आर्टिस्ट' म्हणून काम करण्यास सुरुवात केली."

## आयुष्यमान ३ सुंदरींच्या प्रेमात; 'पति पत्नी और वो २' चा अतरंगी टीजर रिलिज

आयुष्मान खुराना, वामिका गब्बी, सारा अली खान आणि रकुल प्रीत सिंग यांची मुख्य भूमिका असलेल्या 'पती पत्नी और वो २' (Pati Patni Aur Woh 2) या चित्रपटाचा एक अत्यंत विनोदी टीझर प्रदर्शित झाला आहे. चित्रपट निर्मात्यांनी अवघ्या दोन दिवसांपूर्वीच या चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीख जाहीर केली होती. आता, सोमवारी प्रदर्शित झालेल्या १ मिनिट २२ सेकंदांच्या या टीझर प्रदर्शित झाला आहे. १५ मे २०२६ रोजी हा विनोद सिनेमा चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे.

टीझरची सुरुवात एका भारदस्त आणि दैवी आवाजाने होते, जो आपल्याला बी.आर. चोप्रा यांच्या गाजलेल्या 'महाभारत' मालिकेच्या 'कालचक्रा'ची (Wheel of Time) ओळख करून देतो. "मी काळ आहे...". हे कालचक्र आपल्याला सांगते की, काळाच्या ओघाने सर्व काही बदलले आहे. मग ते राजे, ऋषीमुनी



आणि योद्ध्यांच्या गाथा असोत, 'बिग बँग थिअरी' असो, किंवा अगदी डायनासोरची अंडी असोत. मात्र, एक गोष्ट अशी आहे जी आजही तशीच अपरिवर्तित राहिली आहे आणि ती म्हणजे "पतींचा स्वभाव."

कालचक्राच्या जोडीनेच, हा टीझर आपल्याला १९७८ मध्ये प्रदर्शित झालेल्या आणि संजीव कुमार, विद्या सिन्हा व रंजीता कौर यांची भूमिका असलेल्या मूळ 'पती पत्नी और वो' चित्रपटाची झलक दिसते. त्यानंतर, २०१९ मधील याच चित्रपटाच्या रिमेकची झलक दिसते. यामध्ये कार्तिक आर्यन आणि अनन्या पांडे यांच्यासोबत भूमी पेडणेकर मुख्य भूमिकेत होती. त्यानंतर आताची स्टोरी दिसते ज्यामध्ये आयुष्मान खुराना आणि वामिका गब्बी, सारा अली खान आणि रकुल प्रीत सिंग.

यूट्यूबवर हा टीझर शेअर करताना, चित्रपट निर्मात्यांनी कॅप्शनमध्ये लिहीले, ज्यात म्हटले आहे. "काळ सर्व काही बदलतो... पण खुद्द काळाचेही पतींच्या स्वभावावर काहीच नियंत्रण चालत नाही. प्रजापती पांडे येत आहे आणि यावेळी तो सोबत त्याची पत्नी आणि दोन 'इतर स्त्रियांना' घेऊन येत आहे!"

दैनिक निडर निर्भिड
जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# राज्य मार्ग परिवहन महामंडळाचा उपक्रम प्रवाश्यांच्या समस्या व तक्रार निराकरणासाठी प्रवासी राजा व कामगार पालक दिनाचे आयोजन

**जनसंचलन/बुलढाणा**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ बुलढाणा विभागाकडून प्रवाशांना भेडसावणाऱ्या दैनंदिन समस्या, तक्रारी व सुचनांचे आगार पातळीवर जलदगतीने निराकरण करण्यासाठी जिल्ह्यातील प्रत्येक आगारात दर महिण्याच्या बुधवारी सकाळी १० ते २ या वेळेत ङ्गप्रवासी राजा दिनफ व दुपारी ३ ते ५ या वेळेत ङ्गकामगार पालक दिनफ आयोजित करण्यात येणार आहे. त्याअनुषंगाने वेळापत्रक जाहीर करण्यात आले असून प्रवाशी आणि महामंडळाच्या कामगारांनी लाभ घेऊन समस्यांचे निराकरण करावे, असे आवाहन राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे विभाग नियंत्रक यांनी केले आहे. परिवहन महामंडळाच्या आगारामध्ये सकाळी १० ते दुपारी २ दरम्यान प्रवासी राजा दिन साजरा करण्यात येणार आहे. यावेळेत प्रवासी, प्रवासी संघटना, शाळा-महाविद्यालये त्यांच्या समस्या, तक्रारी, सूचना लेखी स्वरुपात मांडू शकतील. तसेच दुपारी ३ ते सायंकाळी ५ दरम्यान कामगार पालक दिन साजरा करण्यात येणार आहे. संघटना, कर्मचाऱ्यांचे प्रश्न, तक्रारी लेखी स्वरुपात घेऊन तक्रारीचे किंवा समस्यांचे तत्काळ निराकरण करतील. बुलढाणा विभागातील चिखली आगार येथे दि. २९ एप्रिल, खामगाव आगार येथे दि. ६ मे, मेहकर आगार येथे दि. १३ मे, मलकापुर येथे दि. २० मे, जळगाव जामोद येथे दि. २७ मे व शेगांव आगार येथे दि. ३ जुन रोजी प्रवासी राजा दिन व कामगार पालक दिन कार्यक्रम घेण्यात येणार आहे. जिल्ह्यातील एसटी बर प्रवाशी व कामगारांनी या सेवेचा लाभ घेवून आपल्या समस्यांचे निराकरण करावे, असे आवाहन विभाग नियंत्रक यांनी केले आहे.

# क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमात बुलढाण्याची उल्लेखनीय झेप; राज्यात अव्वल पाचमध्ये

**जनसंचलन/बुलढाणा**

केंद्र सरकारने निश्चित केलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार व निर्दे शांकांच्या आधारे राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमाचे राज्यस्तरावरून करण्यात आलेल्या मुल्यांकनात बुलढाणा जिल्ह्याने उल्लेखनीय कामगिरी नोंदवत राज्यातील अव्वल पाच जिल्ह्यांमध्ये स्थान मिळवले आहे. सदर मुल्यांकन १ जानेवारी २०२५ ते ३१ डिसेंबर २०२५ या कालावधीतील कामगिरीवर आधारित होते. या यशामध्ये जिल्हाधिकारी डॉ. प्रविणकुमार देवरे, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाबराव खरात, उपसंचालक (आरोग्य सेवा) अकोला मंडळ डॉ. सुशिल वाकचौरे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गिते तसेच जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. दत्तात्रय बिराजदार यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. वर्षा गुट्टे यांनी प्रभावी कामगिरी बजावली. दरम्यान, दि. २२ एप्रिल २०२६ रोजी केंद्रीय आयुष मंत्री (स्वतंत्र प्रभार) तथा आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या आरोग्य विभागाच्या आढावा बैठकीत डॉ. वर्षा श्रीधर गुट्टे यांचा विशेष सत्कार करून अभिनंदन करण्यात आले. जिल्ह्याच्या या यशामुळे क्षयरोग निर्मूलनाच्या दिशेने बुलढाणा जिल्हा ठोस पावले टाकत असल्याचे स्पष्ट झाले आहे.

# उन्हाळ्यातील जनावरांचे चारा व पाणी व्यवस्थापन...

**जनसंचलन/बुलढाणा**

उन्हाळ्यातील कडक उन्हाचा आणि वाढत्या तापमानाचा जनावरांच्या आरोग्यावर मोठा परिणाम होतो. या काळात जनावरांना हीट स्ट्रेस (उन्हाचा ताण) जाणवतो, ज्यामुळे दूध उत्पादनात घट आणि आजार वाढतात. यासाठी खालीलप्रमाणे चारा आणि पाणी व्यवस्थापन करणे अत्यंत आवश्यक आहे.

पाणी व्यवस्थापन : उन्हाळ्यात जनावरांच्या शरीरातील पाण्याची गरज ५०% पर्यंत वाढते. त्यामुळे जनावरांना पिण्यासाठी स्वच्छ आणि थंड पाणी चोवीस तास उपलब्ध असावे. जर चोवीस तास पाणी देणे शक्य नसेल, तर दिवसातून किमान ५ ते ६ वेळा पाणी पाजावे. विशेषतः पहाटे आणि रात्री उशिरा भरपूर पाणी द्यावे. पिण्याच्या पाण्याची टाकी सावलीत असावी जेणेकरून पाणी गरम होणार नाही. गरम पाणी जनावरे कमी पितात.

चारा व्यवस्थापन : भर दुपारी जनावरांना चारा देणे टाळावे. उन्हाळ्यात जनावरांची पचनशक्ती मंदावते. त्यामुळे चारा देण्यासाठी पहाटे सकाळी ६ पूर्वी आणि रात्री ९ नंतर या वेळा निवडाव्यात. नुसता वाळलेला चारा देऊ नये, त्यामुळे जनावरांना बद्धकोष्टतेचा त्रास होऊ शकतो. हिरवा व वाळलेला चारा ३:१ या प्रमाणात कुट्टी करून द्यावा. हिरव्या चाऱ्याची टंचाई असल्यास मुरघास हा सर्वोत्तम पर्याय आहे. तो थंड आणि पाचक असल्याने जनावरे आवडीने खातात.

आहाराची पौष्टिकता वाढवणे : घामावाटे शरीरातील क्षार



कमी होतात. त्यामुळे दररोज प्रति जनावर ५० ते १०० ग्रॅम खनिज मिश्रण द्यावे. आहारात ऊर्जा वाढवण्यासाठी सरकी पेंड, मका भरडा किंवा पशुखाद्याचा वापर योग्य प्रमाणात करावा. उपलब्ध असलेल्या कोरड्या चाऱ्यावर (कडबा/कुटार) युरिया-गूळ प्रक्रिया केल्यास त्याची पौष्टिकता वाढते.

गोठ्यातील व्यवस्थापन : गोठ्याचे छत सिमेंटचे किंवा पत्र्याचे असेल तर त्यावर गवत किंवा पाचट टाकावे. गोठ्याच्या बाजूला ग्रीन नेट किंवा गोणपाटाचे पडदे लावावेत. गोठ्यात हवा खेळती राहण्यासाठी पंख्यांची सोय करावी. जास्त उष्णता असल्यास जनावरांच्या अंगावर किंवा गोठ्यात फॉगर्स (फवारे) चालवावेत.

विशेष काळजी : दूध काढण्याची वेळ उन्हाळ्यात शक्य तितकी लवकर (पहाटे) आणि उशिरा (संध्याकाळी) ठेवावी. जनावरांना शक्य असल्यास दिवसातून दोनदा थंड पाण्याने अंघोळ घालावी. थोडक्यात सांगायचे तर, उन्हाळ्यात जनावरांना थंडावा, पुरेसे पाणी आणि सकस आहार दिला तरच त्यांचे आरोग्य आणि दूध उत्पादन टिकून राहते.

# महाराष्ट्र वैद्यकीय परिषद निवडणूक २०२६ : बुलढाण्यात २६ एप्रिल रोजी मतदान

**जनसंचलन/बुलढाणा**

महाराष्ट्र वैद्यकीय परिषद यांच्या वतीने महाराष्ट्र वैद्यकीय परिषद निवडणूक २०२६ साठी निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्यात आला असून, बुलढाणा जिल्ह्यात मतदान प्रक्रिया रविवार, दि. २६ एप्रिल २०२६ रोजी पार पडणार आहे. या निवडणुकीसाठी सकाळी ८ ते सायंकाळी ५ या वेळेत लेक्चर हॉल कॉम्प्लेक्स, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व जिल्हा महिला रुग्णालय, टी.बी. हॉस्पिटल परिसर, धाड रोड, बुलढाणा येथे मतदान होणार आहे. सदर निवडणूक प्रक्रियेत वैद्यकीय अधिकारी तसेच नोंदणीकृत डॉक्टर हे मतदार म्हणून सहभागी होणार आहेत. बुलढाणा जिल्ह्यात एकूण २ हजार ६३५ मतदार असून प्रत्येक मतदाराला एकूण ९ मते देण्याचा अधिकार आहे. मतदारांची संख्या लक्षात घेऊन प्रशासनाकडून एकूण ४ मतदान केंद्रांची व्यवस्था करण्यात आली आहे. ही सर्व केंद्रे लेक्चर हॉल कॉम्प्लेक्स परिसरातच उभारण्यात आली आहेत. मतदान प्रक्रिया ही गुप्त पद्धतीने महाराष्ट्र वैद्यकीय परिषद नियम १९६७ व महाराष्ट्र वैद्यकीय परिषद (पहिली सुधारणा) नियम २००२ मधील तरतुदीनुसार पार पडणार आहे. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील सर्व पात्र मतदारांनी मतदान प्रक्रियेत सहभागी होऊन आपला मतदानाचा हक्क बजावावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

# एल-निनोच्या पार्श्वभूमीवर राज्यात जिल्हा चारा सुरक्षा आराखडा तयार करण्याचे मुख्यमंत्र्यांचे निर्देश

**जनसंचलन/बुलढाणा**

भारतीय हवामान विभागाने २०२६ च्या मान्सूनवर एल-निनोचा प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता वर्तवली आहे. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील पशुधनाच्या संरक्षणासाठी आणि संभाव्य चारा टंचाईवर मात करण्यासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण आणि तातडीचे निर्देश दिले आहेत. राज्यात सर्वसाधारणपणे हिरव्या चाऱ्याची ४३.९८% तर सुक्या चाऱ्याची २५.१२% तूट असते आणि पाऊस कमी झाल्यास ही तूट वाढण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे. ही परिस्थिती हाताळण्यासाठी प्रत्येक जिल्ह्याने जिल्हा नियोजन व विकास समिती अंतर्गत नाविन्यपूर्ण योजना किंवा आपत्ती निवारण निधीतून चारा बियाणे खरेदीला प्राधान्य द्यावे, अशा सूचना देण्यात आल्या आहेत.मका, ज्वारी, बाजरी यांसारख्या दर्जेदार चारा बियाणांचे कार्यारंभ आदेश महाबीज अकोला यांना ५ मे २०२६ पूर्वी देऊन बियाणे शेतकऱ्यांपर्यंत वेळेत पोहोचवण्याचे नियोजन करण्यात येत आहे. मुख्यमंत्र्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना त्यांच्या जिल्ह्यातील पशुधनाची संख्या विचारात घेऊन स्वतंत्र जिल्हा चारा सुरक्षा आराखडा तयार करण्याचे निर्देश दिले आहेत. या आराखड्यांतर्गत धरणांचे गाळपेरा क्षेत्र व नदीपात्रालगत चारा लागवड करणे, मुरघास प्रकल्पांना गती देणे आणि भविष्यात चारा छावण्यांची गरज भासू नये यासाठी आतापासूनच साठवणुकीचे अचूक नियोजन करण्यावर भर दिला जाणार आहे. पशुसंवर्धन विभागाने या मोहिमेला सर्वोच्च प्राधान्य दिले असून वैरण बियाणे वाटप, हायड्रोपोनिक चारा उत्पादन, मिनी टीएमआर आणि कडबाकुट्टी यंत्रांचे वाटप अशा विविध योजना राबवल्या जात आहेत. पशुसंवर्धन आयुक्त डॉ. किरण पाटील यांनी पशुपालकांना मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजनेचा लाभ घेण्याचे आणि आधुनिक तंत्रांचा वापर करून चारा साठवणूक करण्याचे आवाहन केले आहे.



# क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमात बुलढाण्याची उल्लेखनीय झेप; राज्यात अव्वल पाचमध्ये...



बुलढाणा

केंद्र सरकारने निश्चित केलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार व निर्दे शांकांच्या आधारे राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमाचे राज्यस्तरावरून करण्यात आलेल्या मुल्यांकनात बुलढाणा जिल्ह्याने उल्लेखनीय कामगिरी नोंदवत राज्यातील अव्वल पाच जिल्ह्यांमध्ये स्थान मिळवले आहे. सदर मुल्यांकन १ जानेवारी २०२५ ते ३१ डिसेंबर २०२५ या कालावधीतील कामगिरीवर आधारित होते. या यशामध्ये जिल्हाधिकारी डॉ. प्रविणकुमार देवरे, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाबराव खरात, उपसंचालक (आरोग्य सेवा) अकोला मंडळ डॉ. सुशिल वाकचौरे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गिते तसेच जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. दत्तात्रय बिराजदार यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. वर्षा गुट्टे यांनी प्रभावी कामगिरी बजावली.

दरम्यान, दि. २२ एप्रिल २०२६ रोजी केंद्रीय आयुष मंत्री (स्वतंत्र प्रभार) तथा आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या आरोग्य विभागाच्या आढावा बैठकीत डॉ. वर्षा श्रीधर गुट्टे यांचा विशेष सत्कार करून अभिनंदन करण्यात आले. जिल्ह्याच्या या यशामुळे क्षयरोग निर्मूलनाच्या दिशेने बुलढाणा जिल्हा ठोस पावले टाकत असल्याचे स्पष्ट झाले आहे.

# बायगाव बु. येथे जबरी चोरीचा पर्दाफाश; ५.३८ लाखांचा मुद्देमाल जप्त, तीन आरोपी जेरबंद




जनसंचलन/ देऊळगाव राजा

संतोष जाधव तालुक्यातील ायगाव बुद्रुक येथे घडलेल्या गंभीर जबरी चोरी प्रकरणाचा अंढेरा पोलिसांनी मोठ्या शिताफीने पर्दाफाश केला आहे. मा. पोलीस अधीक्षक निलेश तांबे, अपर पोलीस अधीक्षक अमोल गायकवाड आणि उपविभागीय पोलीस अधिकारी मनीषा कदम यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. गोपनीय माहिती आणि तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे पोलिसांनी तातडीने हालचाल करत तीन आरोपींना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून सोन्याची लगडी ७८.५७० ग्रॅम वजनाची किंमत अंदाजे ४,७७,००० रुपये तसेच एकूण ५,३८,४०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. यामध्ये सोन्या-चांदीचे दागिने, रोकड आणि एक मोटरसायकल यांचा समावेश आहे. अटक आरोपींमध्ये रवी प्रदीप पवार (२१, रा. मोटेगाव, रिसोड), निलेश/ईलेश जगन शिंदे (२५, रा. धानोरी, चिखली) आणि उमेश जगन शिंदे (२३, रा. धानोरी, चिखली) यांचा समावेश आहे. या प्रकरणात अंढेरा पोलिस स्टेशनमध्ये अप. क्र. ८१/२०२६ अंतर्गत कलम ३०९(६), ३३३, १२७(२), ३(५) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ठाणेदार रुपेश शक्करगे यांच्या नेतृत्वाखाली दिनेश घुगे व पथकाने ही यशस्वी कारवाई केली. या कारवाईमुळे परिसरात गुन्हेगारीला मोठा आळा बसल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले आहे.

पाहिजेत
We are Hiring

खंडेलवाल ज्वेलर्स (अकोला) प्रा.लि.
बुलढाणामध्ये
ज्वेलरी शोरुमसाठी तरुण, उत्साही उमेदवार पाहीजेत.

1) शॉप मॅनेजर- 1 (M/F)
कॉम्प्युटर अनुभवी आवश्यक व ज्वेलरी कामाची माहीती असलेल्या अनुभवी व्यक्तींना प्राधान्य

2) सेल्स एग्जीक्यूटिव - 5 (M/F)
बारावी शिक्षण आवश्यक, स्मार्ट व हसतमुख, कॉम्प्युटर अनुभवी आवश्यक.

3) कॅशियर - 2 (M)
पदवीधर आणि तत्पर, जबाबदारीने कॅश काऊंटर हाताळण्याचा अनुभव असलेल्यांना प्राधान्य

आजच संपर्क करा..!

सर्व पदांसाठी सरकारी नियम (PF/ESIC) अनुसारआकर्षक पगार, इन्सेंटीव्हज व ईतर अलाउंस

आपली संपूर्ण माहिती व फोटोसह आपले अर्ज ई-मेल करा
hrkjapl@gmail.com
अधिक माहितीसाठी संपर्क: 9545454762 / 9545450822

# मेहकर नगरपरिषद गाळे प्रकल्पात दिरंगाईवर संतापाची लाट; नगराध्यक्षांची थेट कारवाई

जनसंचलन/मेहकर



अतिक्रमणधारकांसाठी ना नफा ना तोटा तत्त्वावर उभारण्यात येत असलेल्या गाळ्यांच्या कामात गंभीर दिरंगाई झाल्याने व्यापाऱ्यांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. अवघ्या तीन महिन्यांत पूर्ण होणे अपेक्षित असलेला हा प्रकल्प जवळपास वर्षभर उलटूनही अपूर्ण अवस्थेत आहे. त्यामुळे अतिक्रमण हटवल्यानंतर बेरोजगार झालेल्या अनेक दुकानदारांचे व्यवसाय ठप्प झाले असून, त्यांच्यावर आर्थिक संकट कोसळले आहे. या पार्श्वभूमीवर नगराध्यक्ष किशोर गारोळे यांनी प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी धाव घेत पाहणी केली. कामातील संथ गती आणि हलगर्जीपणाबाबत त्यांनी संबंधित अधिकारी व कंत्राटदारांना चांगलेच फैलावर घेतले. जनतेच्या हिताशी कोणतीही तडजोड केली जाणार नाही, असा ठाम इशारा देत प्रलंबित काम तात्काळ पूर्ण करण्याचे आदेश त्यांनी दिले. सध्या ८० टक्के काम पूर्ण झाले असून उर्वरित २० टक्के काम दोन महिन्यांत पूर्ण करण्याचे आश्वासन प्रशासनाकडून देण्यात आले आहे. पूर्ण झालेले गाळे तातडीने अतिक्रमण धारकांना हस्तांतरित करण्याचे निर्देशही नगराध्यक्षांनी दिले.